# जिल्हाधिकारी कार्यालय, नंदुरबार
## (आस्थापना शाखा)
प्रशासकिय इमारत, टोकरतलाव रोड नंदुरबार

दुरध्वनी क्रमांक 02564-210011 ई-मेल estnandurbar@gmail.com


जा.क्र. ब/कक्ष-1/आस्था-3/कावि/ 20 /2019 दिनांक : 28 /01/2020

**ज्ञापन**

तलाठी भरती -2019 या संवर्गातील रिक्त पदे भरणेकामी ऑनलाईन पध्दतीने महापरीक्षा पोर्टलद्वारे दिनांक 02/07/2019 ते 26/07/2019 या कालावधीत नंदुरबार जिल्हयातील लोणखेडा ता. शहादा या केंद्रावर घेण्यात आलेली होती. सदर परीक्षेची एकत्रित गुणांची यादी (राज्यस्तरीय) महापरीक्षा पोर्टलच्या वेबसाईटवर दिनांक 07/09/2019 रोजी प्रसिध्द करण्यात आलेली आहे. महापरीक्षा पोर्टलमार्फत घेण्यात आलेल्या तलाठी भरती-2019 मध्ये प्रविष्ठ उमेदवारांची नंदुरबार जिल्हयातील पदाकरीता प्रविष्ठ झालेल्या परीक्षार्थींची गुणांची निकालाची CD व Pass Ward महापोर्टल कार्यालयाकडून मा. विभागीय आयुक्त, नाशिक यांचेकडून दिनांक 18/09/2019 अन्वये या कार्यालयास प्राप्त झाली आहे.

सदर गुणांच्या यादीबाबत कार्यालास येणाऱ्या अडचणी बाबत इकडील पत्र क्रमांक ब/ कक्ष-1/ आस्था-3/कावि/247/2019 दिनांक 25/09/2019 व पत्र क्रमांक ब/ कक्ष-1/ आस्था-3/कावि/370/2019 दिनांक 31/12/2019 अन्वये शासनाकडून मार्गदर्शन मागविण्यात आले होते. त्यानुसार शासन पत्र क्रमांक आस्था-2019/प्र.क्र. 227/ ई-10 दिनांक 11 डिसेंबर 2019 अन्वये तलाठी (गट-क संवर्ग) पदाच्या परीक्षेचा जिल्हानिहाय निकाल जाहिर करण्यास संबंधित जिल्ह्याची जिल्हा निवड समिती सक्षम असल्याबाबत कळविले आहे.

त्यानुसार नंदुरबार जिल्ह्यातील तलाठी संवर्गातील रिक्त पदांकरीता महापरीक्षा पोर्टल मार्फत झालेल्या परीक्षेत महापोर्टलद्वारे कळविण्यात आलेल्या माहितीच्या आधारे प्रवर्गनिहाय प्रविष्ठ झालेल्या उमेदवारांची गुणांची यादी जिल्हाधिकारी नदुरबार यांचे www.nandurbar.nic.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे. सदर गुणांच्या यादीबाबत समाविष्ट नावाबाबत हरकत/ तक्रार असल्यास तक्रारीच्या पुराव्यासह महापरीक्षा पोर्टल (माहिती तंत्रज्ञान) मुंबई www.mahapariksha.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने तक्रार नोंदवून त्याची प्रत याकार्यालयास दिनांक 05 /02/2020 पर्यंत सादर करण्यात यावी.

(डॉ. राजेंद्र भारुड)
अध्यक्ष
जिल्हा निवड समिती तथा
जिल्हाधिकारी नंदुरबार

प्रत :- जिल्हा माहिती अधिकारी, नंदुरबार यांना माहिती व प्रसिध्दी कामी रवाना.
प्रत :- जिल्हा सुचना व विज्ञान अधिकारी, नंदुरबार यांना गुणवत्ता यादी व पत्र नंदुरबार जिल्हयाचे संकेतस्थाळवर प्रसिध्द करणेसाठी रवाना.